# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र

## सेतू अभ्यास - पूर्व चाचणी

**विषय : गणित** **इयत्ता - पाचवी** **गुण — १५**

**विद्यार्थ्याचे नाव - ..............................................................................**

---

प्रश्न १. प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमासाठी मनवाने दिनांक २१ जानेवारी ते २४ जानेवारी पर्यंत गायनाचा सराव केला,तर तिने एकूण किती दिवस सराव केला? (गुण १)

.................................

प्रश्न २. उदाहरण सोडव. ३५७८ + ४५८७ (गुण १)

प्रश्न ३. उदाहरण उभी मांडणी करून सोडव. ५३२० — ४५२ (गुण १)

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| - | | | |
| | | | |

प्रश्न ४. एका शाळेत परिपाठासाठी प्रत्येक रांगेत ११ विद्यार्थी अशा १५ ओळी तयार केल्या. तर परिपाठासाठी एकूण किती विद्यार्थी उपस्थित होते ? (गुण १)

प्रश्न ५. केदारने वाढदिवसानिमित्त ४८ वह्या भेट म्हणून देण्यासाठी आणल्या. त्याने आपल्या प्रत्येक मित्राला तीन-तीन वह्या वाटायचे ठरवले तर त्या वह्या किती मित्रांना वाटता येतील ? (गुण १)

प्रश्न ६. सोडव. (गुण १)

५)५४५

प्रश्न ७. गोकुळ आणि मारोती दोघांजवळ प्रत्येकी शंभर रुपये होते. गोकुळने १२ रुपये खर्च केले तर मारोतीने १८ रुपये खर्च केले. आता त्यांच्याजवळ प्रत्येकी किती रुपये शिल्लक राहिले ? (गुण १)

प्रश्न ८.१२७५ या संख्येत चार दशक आणि तीन शतक मिळविल्यास उत्तर किती येईल ? (गुण १)

प्रश्न ९. राजनची धावपट्टी अनिलची धावपट्टी (गुण १)







वर दिलेल्या धावपट्टीवर दोघांनी धावण्याची एक फेरी पूर्ण केली असेल तर खालील विधानांपैकी अयोग्य विधानाला X अशी खूण कर.

अ) राजन १४ मीटर धावला. ब) अनिल १२ मीटर धावला.

क) अनिल दोन मीटर जास्त धावला. ड) राजन दोन मीटर जास्त धावला.

प्रश्न १०. निरीक्षण कर आणि दिलेली एकूण रक्कम किती ते चौकटीत लिही. (गुण १)



₹ [ ]

प्रश्न ११ . दिलेला अपूर्णांक शब्दात लिही. (गुण १)

९$\frac{१}{२}$ ......................................

प्रश्न १२. खालील सारणीचे निरीक्षण करून उत्तरे लिही. (गुण २)




प्रमाण ✿ = १० फुले

- रुखसारकडील फुले अंजलीकडील फुलांपेक्षा कितीने कमी आहेत?
- अंजली व आलिया यांची फुले एकत्रित केल्यास ती संख्या वैभवच्या फुलांपेक्षा कितीने जास्त असतील ?

प्रश्न १३. खालील नक्षीचा आकृतिबंध पूर्ण कर . (गुण १)



प्रश्न १४. अमितजवळ आंब्यांची २४ खोकी असून त्या प्रत्येकात १२ आंबे आहेत. तर त्याच्याजवळ एकूण किती आंबे आहेत ? (गुण १)

| X | २० | ४ |
|---|---|---|
| १० | | |
| २ | | |